
# जादूगार परी



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ३६५

BVBK-0400365

॥ श्री ॥

# जादूगार परी
# आणि
# धाकटा राजपुत्र

रामकृष्ण चौधरी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय वि...
क्र. ३६५...
विषय बा. वा.  क्र. ........

एक रुपया

ग्रंथ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते

**श्रीराम प्रकाशन**

झावबाची वाडी
ठाकुरद्वार,
मुंबई क्रमांक २

## आमच्या बालमित्रांची आवड

| | | |
|---|---|---|
| जादूचा राजहंस | जादूची पुतळी | जादूचे जोडे |
| जादूचा पक्षी | धाडसी राजपुत्र | हिमराक्षस |
| काळा चोर | जलराक्षस | जादूचा भुंवर |
| जादूचा गालीचा | जादूचा किल्ला | पाच पांडव |
| चंद्रसेन आणि उडता घोडा | राजा दक्ष | संत एकनाथ |
| संत ज्ञानेश्वर | चीन देशची राजकन्या | यज्ञकन्या द्रौपदी |
| छत्रपती शिवाजी महाराज | संत तुलसीदास | नऊनाथांच्या गोष्टी |
| काळा राक्षस | श्रीरामचंद्र | धनुर्धारी अर्जुन |
| जादूचा पिसारा | जादूचे विमान | लव कुश |
| हिमगौरी | जादूचा वेल | जादूचे अंजीर |
| जादूचा मुकुट | जादूचा घोडा | सोनेरी पेला |
| जादूचे जहाज | जादूची अंगठी | जादूगार फकीर |
| दोन राजपुत्र | जादूची तलवार | जादूचा भोपळा |
| तीन राजपुत्र | राक्षसाची पेटी | जादूचा राजवाडा |
| जादूचा आरसा | जादूचे कबूतर | जादूचा अंगरखा |
| जादूची खुर्ची | जादूची पेटी | जादूगार चेटकीण |
| बुटका जादूगार | राजपुत्र खुदादाद | लाल चोर |
| जादूचा मासा | जादूचा करंडा | जादूचे पान |
| एक राक्षस | दोन राक्षस | गोपालकृष्ण |
| जादूचे सरोवर | लबाड जादूगार | राक्षसांचा राजा |
| अलीबाबा आणि चाळीस चोर | | सोनेरी केसांचा राक्षस |

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रकाशिका :
सौ. शैलजा भावे.
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २

मकर संक्रांत
जानेवारी ७७

मुद्रक
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणे २

# जादूचा गालिचा

बऱ्याच वर्षांपूर्वी भारतामध्ये एक बादशहा होऊन गेला. त्याला तीन पुत्र होते, हुसेन, अली आणि महंमद. तिघेही रूपगुणसंपन्न होते. आणि त्याला एक नूरनिहार नावाची लावण्यवती पुतणी होती. तीही त्याच्याकडे राही.

नूरनिहार ही बादशहाच्या धाकट्या भावाची कन्या. बाप लहानपणीच वारल्यामुळे तिचे पालनपोषण बादशहानेच केले. नूरनिहार उपवर झाली होती आणि तिन्ही राजपुत्रांचे तिच्यावर प्रेम जडले होते. आता काय करायचे ? बादशहाला विचार पडला. मग त्याने आपल्या तिन्ही मुलांना बोलावून सांगितले की, "मुलांनो, नूरनिहार एक स्त्री आहे. तिचे कोणातरी एकाशीच लग्न होणार, तिघांशी काही होणे शक्य नाही; तेव्हा मी एक उपाय सांगतो. तुम्ही तिघेही प्रवासाला जा आणि अशा वस्तू घेऊन या की, त्या मला चमत्कारिक व अपूर्व वाटतील. त्यांपैकी मला ज्याची वस्तू सर्वात जास्त चमत्कारिक वाटेल त्याच्याबरोबर मी नूरनिहारचे लग्न लावून देईन."

बादशहाची कल्पना तिन्ही पुत्रांना पसंत पडली. दुसऱ्याच दिवशी तिघांनी व्यापाऱ्याचा पोशाख केला, एक एक गुलाम बरोबर घेतला व बापाचा निरोप घेऊन तिघेही प्रवासाला निघाले. पहिल्या दिवशी ते एकाच दिशेने गेले. संध्याकाळी त्यांना असे एक ठिकाण लागले की, तेथून तीन दिशांना तीन रस्ते फुटले होते. त्यांनी रात्रभर तेथील धर्मशाळेत मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी, एक वर्षाने ह्याच ठिकाणी तिघांनी एकत्र जमावे, असे ठरवून एकमेकांना आलिंगन देऊन ते घोड्यावर स्वार झाले व तिघे तीन रस्त्यांनी निघाले.

मोठा भाऊ हुसेन वीसनगराकडे निघाला. ते फार मोठे व्यापारी शहर होते. मजल दरमजल करीत तीन महिन्यांनी तो वीसनगरास पोचला आणि तेथे एका व्यापारी निवासस्थानात त्याने मुक्काम ठोकला.

एके दिवशी राजपुत्र त्या शहराची शोभा पाहात भटकत होता. तो एका दुकानाजवळ जरा थांबला, तोच रस्त्याने एक माणूस "गालिचा घ्या गालिचा" असे ओरडत जाऊ लागला. राजपुत्राने त्या माणसाला बोलावून गालिच्याची किंमत विचारली. त्या गालिच्यावाल्याने त्याची किंमत 'चाळीस हजार मोहरा' सांगितली.

गालिचा साधारण होता. इतकी किंमत ऐकून राजपुत्र अगदी गारच झाला अन् तो म्हणाला, "नको रे बाबा तुझा गालिचा !"

गालिच्यावाला म्हणाला, "महाराज ! रंगरूपावर त्याची किंमत नाही. गुणावर किंमत आहे. ह्या गालिच्यात असा गुण आहे की, जो कोणी ह्यावर बसेल, त्याला हवे तेथे हा एका क्षणात उडत घेऊन जाईल. असा आहे हा गालिचा."

राजपुत्राने विचार केला, असे असेल तर ही फारच चमत्कारिक वस्तू म्हटली पाहिजे. मग तो म्हणाला, "अरे बाबा, तू हा गालिचा जादूचा म्हणतोस खरा, पण त्याची खात्री काय ? हो, नाही तर.."

गालिच्यावाला म्हणाला, "महाराज ! हातच्या काकणाला आरसा कशाला ? आता मी गालिचा पसरतो, आपण दोघेही यावर बसू नि उडत उडत आकाशमार्गाने आपल्या बिऱ्हाडी जाऊ. तेथे पोचल्यावर मला त्याची किंमत द्या म्हणजे झाले."

लगेच त्याने गालिचा पसरला. त्यावर दोघेही बसले. राजपुत्राने आपल्या बिऱ्हाडी पोचण्याचा विचार मनात आणला. एका क्षणातच गालिचा दोघांना घेऊन उडाला व राजपुत्राच्या बिऱ्हाडी जाऊन

पोचला. खात्री पटल्यावर राजपुत्राने चाळीस हजार मोहरा देऊन तो गालिचा विकत घेतला.



राजपुत्र हुसेन आता खुशींत होता. त्याला वाटत होते की, गालिचा आपल्या वडिलांना आवडेल व आपले नूरनिहारबरोबर नक्की लग्न होईल.

त्यानंतर हुसेनने काही दिवस वीसनगरात काढले. मग एके दिवशी त्याने ओळखीच्या सर्व लोकांच्या भेटी घेतल्या आणि तो व त्याचा गुलाम दोघेही गालिच्यावर बसले. लगेच राजपुत्राने तिघा भावांच्या भेटीच्या ठरलेल्या स्थळाची कल्पना केली. थोड्याच वेळात गालिचा आकाशमार्गाने त्यांना त्या ठिकाणी घेऊन आला. तेथील धर्मशाळेत भावांची वाट पाहात राजपुत्र हुसेनने मुक्काम ठोकला.

## जादूची नळी

अली धर्मशाळेतून जो निघाला तो इराणच्या मार्गाने गेला. रस्त्यात त्याला काही व्यापारी भेटले. त्यांच्या सहवासाने तो चार

महिन्यांनी इराणची राजधानी शिराज येथे जाऊन पोचला व एका व्यापारी सराईत त्याने मुक्काम ठोकला.

एके दिवशी तो शहराची शोभा पाहात असताना त्याच्या कानी पुढील शब्द पडले. "हस्तिदंती नळी--जादूची नळी. किंमत चाळीस हजार मोहरा! घ्या ऽऽ हो घ्या!"

राजपुत्राने आश्चर्यानेच तिकडे पाहिले. "ही लहानशी हस्तिदंती नळी अगदी साधी अन् किंमत चाळीस हजार मोहरा! बाप रे! पाहू बरं काय गौडबंगाल आहे ते!" असे मनात आणून तो त्या माणसाजवळ गेला आणि म्हणाला, "भल्या गृहस्था! अरे ही नळी ती काय! अन् खुशाल चाळीस हजार मोहरा किंमत सांगतोस?"

नळीवाला म्हणाला, "महाराज! ही नुसती नळी नाही, ही दुर्बीण आहे. अन् तीसुद्धा अशी की, जगात अशी दुसरी आढळायची नाही. ह्या नळीतून तुम्ही पाहा आणि कोठले दृश्य तुम्हाला पाहावयाचे आहे ते मनात आणा, बरोबर तेच दृश्य तुमच्या डोळ्यांसमोर येईल. अद्भुत नळी आहे ही!" असे म्हणून त्या नळीवाल्याने ती नळी राजपुत्र अलीच्या डोळ्याला लावली.

लगेच अलीने मनात आणले की, आपल्या पित्याचे दर्शन व्हावे. एका क्षणात बादशहाचा दरबार त्याच्या डोळ्यांसमोर दिसू लागला. वडिलांना पाहून त्याला आनंद झाला. नंतर त्याला वाटले, नूरनिहार दिसावी. लगेच तीही त्याच्या डोळ्यांसमोर आली.

मग राजपुत्र त्या नळीवाल्याला म्हणाला, "मी घेतली ही नळी विकत. तुम्ही माझ्या बिऱ्हाडी चला. तेथे मी हिची किंमत देतो." बिऱ्हाडी जाऊन राजपुत्राने मोहरा दिल्या व नळी विकत घेतली.

आता राजपुत्र अली फार खूष होता. त्याला वाटत होते, "झाले

आपले काम. जगात अशी आश्चर्यकारक वस्तू असणेच शक्य नाही. आता पिताजी खूष आणि मग माझेच लग्न नूरनिहारबरोबर!"

थोड्याच दिवसांत त्याने सर्व शहर पाहून घेतले. इराणच्या बादशहाची भेट घेतली व भारताकडे परतला. ईश्वरकृपेने कोणतेही संकट न येता ठरलेल्या धर्मशाळेत तो येऊन पोचला.

तिसरा व सर्वांत धाकटा भाऊ राजपुत्र महंमद हा समरकंद शहराच्या रस्त्याने गेला होता. तो काही दिवसांनी समरकंद शहरी जाऊन पोचला. दुसऱ्या दिवसापासून तो शहरातील फेर-फटक्यास जाऊ लागला. एके दिवशी तो सहज फळबाजारात फिरत असताना त्याला एक माणूस सिताफळे विकीत असताना दिसला. त्याच्याजवळ केवळ दोनच सिताफळे होती, पण ती दोन्ही हुबेहुब सारखी होती. त्याच्यासमोर लोकांची गर्दी जमली होती.

दोनच सिताफळे आणि चाळीस हजार मोहरा किंमत ! काहीतरी विशेष प्रकार असला पाहिजे हा ! राजपुत्र महंमदाने विचार केला. तो जरा बारकाईने त्या सिताफळांकडे पाहू लागला. लोक पांगल्या-वर तो त्या सिताफळवाल्यास म्हणाला, "बाबा रे ! ह्या फळांत असा कोणता गुण आहे की, तू ह्यांची इतकी भरमसाट किंमत सांगतोस ?"

तो फळवाला म्हणाला, "महाराज ! ही फळे फारच अमोल आहेत. ह्यांच्यापुढे धन-द्रव्य, राज्य वगैरे वैभव काहीं कामाचे नाही. ही फळे म्हणजे अमृत आहे असे समजा. कोणीही, कशानेंही, कितीही आजारी असो, अगदी बिछान्याला खिळलेला असो, एकदा का त्याने हे फळ हुंगले की, तो लगेच बरा झाला म्हणून समजा."

राजपुत्र महंमद म्हणाला, "बाबा रे ! तू जे हे सगळे सांगतोस ते खरे कशावरून ? नाहीतर माझ्यासारख्याने ही फळे घ्यावीत आणि त्याची फसवणूक मात्र व्हावी !"

हा संवाद ऐकत एक मनुष्य बाजूला उभा होता. तो म्हणाला, " माझा एक मित्र फार आजारी आहे. जर ह्या फळांचा असा गुण असेल तर घेऊ या त्याची परीक्षा. माझा मित्र बरा होईल व तुमचीही परीक्षा होईल. "

हा विचार पसंत पडून तिघेही त्या आजारी माणसाच्या घरी गेले. सिताफळवाल्याने एक सिताफळ त्या आजारी माणसाच्या नाकाशी लावले, ते त्याने हुंगले मात्र ! तो ताबडतोब खडखडीत बरा झाला व उठून बसला. राजपुत्र महंमदाची खात्री पटली आणि त्याने ताबडतोब चाळीस हजार मोहरा देऊन ती सिताफळे विकत घेतली. मग राजपुत्र थोडे दिवस ते शहर व भोवतालचा प्रदेश पाहून भारतात येण्यासाठीं निघाला. काही दिवसांनी ठरलेल्या ठिकाणी तो येऊन पोचला.

तिघे भाऊ एकत्र जमले. तिघांच्या भेटी होताच ते एकमेकांना कडकडून भेटले. कुशल समाचाराच्या गोष्टी झाल्या आणि मग मोठा भाऊ हुसेन म्हणाला, "पाहा ! आपण तिघेही भाऊ आहोत. एकाच नूरनिहारच्या प्राप्तीच्या हेतूने आपण प्रयत्न करीत आहोत. ज्याच्या नशिबी असेल त्याला मिळेल ती. पण कुणी काय काय वस्तू आणल्या ते तर सांगा आधी. प्रथम मीच सांगतो."

## राजकन्या

मग हुसेन आपल्या प्रवासाची माहिती सांगू लागला. "मी वीस-नगरला गेलो होतो. तीन महिने प्रवास केला. पाच महिने तेथे राहिलो आणि तुम्हा दोघांच्या आधी येथे आलो. आज तीन महिने तुमची वाट पाहात आहे... "

लगेच दुसरा राजपुत्र अली मध्येच म्हणाला, "मग कळलं रे कळलं तुझ्याजवळ काय आहे ते !"

आणि त्यालाही तेच दृश्य पाहायला मिळाले. त्याला फार वाईट वाटले.

नंतर महंमदाने ती नळी घेतली व त्यानेही नूरनिहारची स्थिती पाहिली अन् तो म्हणाला—

" गड्यांनो ! नूरनिहार तर मृत्यूच्या मार्गावर आहे. पण ती अजूनही जगू शकेल. पाहा, तुमच्या दोन्ही गोष्टी फारच अमोल आहेत, पण माझ्याजवळ ही सिताफळे आहेत हीही तितकीच अमोल आहेत. मी पण ह्यांच्यासाठी चाळीस हजार मोहरा दिल्या. हे फळ अमृतगुणी आहे कशानेही माणूस आजारी असो, कितीही दिवसांचा आजारी असो, त्याला हे फळ हुंगायला दिले की, तो ताबडतोब बरा होतो. "

हुसेन-'तर मग आता वेळ नको, आपण तिघेही ह्या गालिच्यावर बसून निघू या.'

लगेच ते तिघे भाऊ गालिच्यावर बसले. तिघांनी मनात कल्पना केली की, आपण नूरनिहारच्या महालात पोचलो पाहिजे आणि एका क्षणात ते नूरनिहारच्या महालात येऊन पोचले.

त्यांनी नूरनिहारची स्थिती पाहिली. ती जशी नळीतून दिसली होती तशीच दिसत होती. लगेच महंमदाने सिताफळ काढून तिच्या नाकाला लावले. नूरनिहारने ते एकदा हुंगले मात्र, लगेच ती बरी झाली. तिचा रोग नाहीसा झाला व ती हसत उठून बसली.

तिघेही राजपुत्र बादशहापुढे हजर झाले. त्यांनी बादशहाला सलाम केला आणि प्रत्येकाने आपापल्या वस्तूची सर्व माहिती बादशहाला कथन केली.

आपल्या तीन मुलांनी केलेले पराक्रम पाहून राजाला अतोनात आनंद झाला होता आणि नूरनिहारचे प्राण वाचले म्हणून तर तो आनंद दुप्पट झाला होता। पण शेवटी निर्णय कसा द्यावा ह्याबद्दल

काही त्याचा निश्चय ठरेना. शेवटीं बादशहा मुलांना म्हणाला, " मुलांनो, तुम्ही तिघांनीं आणलेल्या वस्तु सारख्याच अद्भुत व आश्चर्यकारक आहेत. जरी महंमदाच्या सिताफळाने नूरनिहार वाचली, तरीं अलीच्या दुर्बिणीने जर तिची स्थिती तुम्हाला कळली नसती तर सिताफळांचा उपयोग झाला नसता आणि त्या दोन्ही वस्तू जरी असत्या, तरी गालिच्याशिवाय तुम्ही येथे झटकन् येऊन पोहोचला नसता. असो ! मी जी युक्ती योजिली होती ती अशा प्रकारे निरर्थक ठरली.

आता मी दुसरी युक्ती योजणार आहे आणि आजच ह्या सर्व गोष्टींचा निकाल लावणार आहे. तुम्ही धनुष्यबाण घेऊन मैदानात चला. तिघांनी बाण सोडावयाचे व ज्याचा बाण पुढे जाईल त्याच्याबरोबर नूरनिहारचे लग्न होईल. "

नंतर तिघेही राजपुत्र व बादशहा मैदानावर गेले. प्रथम हुसेननें बाण सोडला. नंतर अलीने सोडला आणि अलीचा बाण हुसेनच्या बाणाच्या पुढे गेला. शेवटी महंमदाने बाण सोडला पण तो कुणीकडे गेला ह्याचा पत्ताच लागेना. शोध शोध शोधले, पण तो बाण काही सापडेना. महंमदाचे म्हणणे पडले की, त्याचा बाण दोघांच्याही बाणांच्या पुढे गेला. पण खूप शोध करूनही बाणाचा शोध लागला नाही म्हणून बादशहाने अलीनेच जिंकल्याचे ठरविले आणि थोड्याच दिवसांनी त्याचे नूरनिहारशी थाटात लग्नही लावून दिले.

पण लग्नाला हुसेन आला नाही. त्याचे नूरवर अतिशय प्रेम होते. त्यामुळे त्याला फार दुःख झाले आणि तो इतका उदास झाला की, राज्यावरचा आपला हक्कही त्याने सोडून दिला आणि तो एका अरण्यात एक ज्ञानी फकीर होता त्याच्या आश्रमात जाऊन राहिला.

# परी

महंमदालाही फार वाईट वाटले आणि तोही लग्नाला हजर राहिला नाही. बाण नाहीसा झाला ह्याचे त्याला फार दुःख झाले. बाण शोधून काढलाच पाहिजे असा त्याने निश्चय केला. ज्या दिशेने त्याने बाण सोडला होता त्या दिशेने तो पुढे पुढे जाऊ लागला, पण बाण काही केल्या सापडेना. तरी तो तसाच पुढे गेला. पाच कोस गेल्यावर त्याला एक पर्वताची तुटलेली कडा लागली आणि आश्चर्य असे की, त्या कडेजवळच त्याचा बाण पडलेला त्याला आढळला.

तो विचार करू लागला, बाण तर आपलाच, पण इतका दूर येईल कसा ? ह्यात काही तरी गूढ असले पाहिजे असे त्याला वाटले व तो थोडा वेळ तेथेच थांबला. तेथे जरा आजूबाजूला त्याला काही दऱ्या दिसल्या. त्यांपैकी एका दरीत तो उतरला. त्या दरीच्या कडेला एक गुहा त्याला आढळली. तो आत शिरला. आत एक लोखंडी दरवाजा होता. त्याने जरा हिम्मत केली व तो दरवाजा लोटला. दरवाजा धाडकन् उघडला. आपले धनुष्यबाण सावरून तो खाली उतरू लागला.

काही अंतर चालन गेल्यावर त्याला एक फार सुंदर असा महाल आढळला. तो जरा सावधतेनेच त्या महालात शिरला. महाल फार सुंदर होता. इतक्यात एक अत्यंत लावण्यवती तरुणी त्या महालातून बाहेर आली.

अन् ती म्हणाली, "राजपुत्रा, यावे, आपले स्वागत असो. चला महालात."

राजपुत्र –बाईसाहेब, माफ करा. मी आपली परवानगी न घेता येथे आलो, चूक झाली माझी.

स्त्री –काही चूकबीक नाही झाली. आलात तर बिघडले कोठे? राजपुत्राचे स्वागत करावयाचे भाग्य मला प्राप्त झाले उलट !

राजपुत्र–बाईसाहेब ! आपण आमच्या राजधानीच्या इतक्या जवळ राहता, पण मी मात्र आपणाला कधी पाहिलेसे वाटत नाही, आणि आपण मात्र मला ओळखत आहा असे वाटते.

स्त्री –मग सांगते;

अन् ती पुढे निघाली व राजपुत्र तिच्या पाठीमागून महालात गेला. ती स्त्री राजपुत्राला एका अत्यंत सुशोभित केलेल्या दिवाण-खान्यात घेऊन गेली. तेथं एक शृंगारलेला पलंग होता. त्यावर ती बसली. राजपुत्रालाही तिने पलगावरच बसवून घेतले, आणि ती म्हणाली, "राजपुत्र ! माझे नाव बानू परी. मी यक्षकन्या आहे. आम्हा यक्ष जातीला भूतभविष्याचे सगळे ज्ञान असते. मी तुम्हाला ओळखतं. तुम्ही तिघा भावांनी नूरनिहारसाठी काय काय केले ते सर्व मला माहात आहे. तुमच्या बाणांच्या शर्यतीच्या दिवशीही मी तेथेच होते. तुमच्या बाणाला मी जास्त वेग दिला त्यामुळे तो खूपच पुढे गेला आणि सापडलाच नाही. कदाचित् त्यापेक्षा अधिक सुख तुमच्या नशिबी असेल."

परी बानूच्या मनातील भावना राजपुत्राने तेव्हाच ताडली. बानू नूरनिहारपेक्षा जास्त सुंदर होती. तिला दिव्य दृष्टी होती. तो बानू-वर मोहित झाला आणि म्हणाला, "बाईसाहेब ! आपला शब्द खरा ठरो. आपली जी आज्ञा होईल तसे वागायला मी तयार आहे."

परी म्हणाली, "हे पहा, मला माझा पती शोधायची माझ्या आईबापांची पूर्ण परवानगी आहे. आणि आज माझे वरसंशोधन पूर्ण झाले आहे असे मला वाटते." अशा तऱ्हेने परी बानूने आपली इच्छा राजपुत्राला सांगितली आणि राजपुत्रानेही होकार दिला.

लगेच लग्नाच्या तयारीला सुरवात झाली. एक महाल शृंगारण्यात आला आणि त्याच दिवशी लग्न झाले. मोठी मेजवानी झाली व यक्षयक्षिणींचे अत्यंत नयनमनोहर नृत्य झाले. आणि अशा तऱ्हेने राजपुत्र महंमदाचे आयुष्य सुखात जाऊ लागले. परी बानूनेही त्याची अशी सेवा केली की, तो आपले पूर्वीचे सगळे जग विसरून गेला.

सुमारे सहा महिने गेल्यावर एके दिवशी राजपुत्राला वडिलांची आठवण झाली आणि वडिलांची भेट घेतली पाहिजे असे त्याला वाटू लागले. तो बानूला म्हणाला, " हे प्रियतमे ! मला वडिलांच्या भेटीला जावेसे वाटते, तर काही दिवस मी जाऊन येतो. "

हे ऐकताच बानूला जणू धक्काच बसला. ती म्हणाली, "नाथ! का बरे हा एकाएकी बेत ठरला ? मी आपणाला नकोशी झाले काय ? "

राजपुत्र – "हे प्रिये ! तसे काही नाही. तुझे माझ्यावर किती प्रेम आहे हे मी जाणतो. पण बरेच दिवस झाले, वडिलांना माझा काही थांगपत्ता नाही. म्हणून वाटते की, जावे व एकदा त्यांना भेटून यावे, पण तुझी इच्छा नसेल तर रद्द करतो मी माझा बेत."

बानूच्या इच्छेवरून त्याने बापाच्या भेटीस जाण्याचा विचार तहकूब केला, पण कायमचा सोडून दिला नाही. पुढे त्याने बानूजवळ आपल्या वडिलांचा थोरपणा हळूहळू सांगायला सुरवात केली. हेतू हा की, तिला आपल्या वडिलांचा थोरपणा पटला म्हणजे थोड्या दिवसांसाठी तरी ती जायला परवानगी देईल.

## बादशहाच्या दरबारात

इकडे अलीचे व नूरनिहारचे लग्न लागले खरे, पण मोठा राजपुत्र हुसेन फकीर बनला व धाकटा राजपुत्र महंमद नाहीसा झाला

त्यामुळे बादशहाला फार दुःख झाले. त्याने वजिराला बोलावले अन् तो म्हणाला, " प्रधानजी, मोठा मुलगा तर लागला परमार्थाच्या मार्गाला, पण धाकटयाचा शोध केलाच पाहिजे."

प्रधानाने खूप प्रयत्न केला. जिकडे तिकडे जासूद पाठविले. शोधाशोध केली, पण यश काही आले नाही. तेव्हा प्रधानाने एक निराळाच उपाय शोधून काढला. त्या गावात एक चेटकी राहात होती. एके दिवशी तो तिला बादशहाकडे घेऊन गेला.

बादशहा तिला म्हणाला, " बाईसाहेब ! माझा लाडका मुलगा महंमद सहा महिन्यांपासून नाहीसा झाला आहे, त्यामुळे मी फार काळजीत पडलो आहे. आपण आपल्या मंत्राच्या जोरावर माझ्या लाडक्या महंमदाचा काहीं तपास लावून द्याल तर माझ्यावर फार उपकार होतील. मी आपणाला मोठे इनाम देईन."

चेटकी म्हणाली, "महाराज, मी पाहाते प्रयत्न करून, पण मला एक दिवसाची मुदत मात्र पाहिजे," आणि एक दिवसाची मुदत घेऊन ती घरी गेली.

दुसऱ्या दिवशी चेटकी आली. ती बादशहाला म्हणाली, "महाराज, राजपुत्र महंमद जिवंत आहे इतके मला निश्चित कळले, पण ह्याशिवाय त्याच्याबद्दल आणखी काही कळत नाही. माझ्या मंत्रतंत्राची शक्ती ह्यापुढे काही जाऊ शकत नाही. क्षमा असावी मला."

चेटकीचे हे बोलणे ऐकून बादशहाची चिंता किंचित् कमी झाली, परंतु त्याचे समाधान मात्र झाले नाही.

तिकडे राजपुत्र महंमद दररोज बानूला आपल्या वडिलांच्या चांगल्या गोष्टी सांगू लागला व काही दिवसांनी बानूच्या मनात त्याने आपल्या वडिलांविषयी आदर निर्माण केला. आणि एके

दिवशी तिची तिलाच पितापुत्रांच्या प्रेमाची जाणीव झाली. तिने राजपुत्राला वडिलांच्या भेटीस जाण्याची आपण होऊन परवानगी दिली, पण लवकर परत येण्याचे मात्र त्याच्याकडून कबूल करून घेतले. तसेच ती म्हणाली,

"मात्र लक्षात ठेवा, तुम्ही अशा प्रकारे येथे राहात आहात ह्याबद्दल वडिलांना चुकूनसुद्धा काही सांगू नका."

अशा प्रकारे राजपुत्र एकदाचा आपल्या वडिलांच्या भेटीला तेथून निघाला. राजपुत्राच्या सेवेला एक अत्यंत सुंदर घोडा दिला गेला त्यावर तो आरूढ झाला आणि त्याने भरधाव घोडा फेकला. राजधानी तेथून जवळच होती थोड्याच वेळात तो राजधानीत जाऊन पोचला आणि सरळ राजवाड्यात गेला.

बादशहाला ही खबर लागताच तो धावतच मुलाला सामोरा गेला. त्याने त्याला कडकडून मिठी मारली. तो म्हणाला, "बाळा! कुठे रे गेला होतास तू इतके दिवस? माझी काय दशा झाली बघ! अरे, अलीला नशीबाने हात दिला म्हणून का तू रुसावेस? तू त्याचा भाऊच ना?"

राजपुत्र म्हणाला, "माझे नूरवर प्राणाप्लीकडे प्रेम होते आणि तिचे लग्न अलीशी झाल्यामुळे मला फार वाईट वाटले. त्यात आपला काही दोष नव्हता. त्यावेळी आपणाला जे योग्य तेच आपण केलेत पण मी वैतागलो. आपला बाण शोधून काढलाच पाहिजे, असा मी निश्चय करून त्याप्रमाणे मी बाण ज्या दिशेला सोडला त्या दिशेला बाण शोधत शोधत निघालो.

कोठे जावयाचे हे ठरले नव्हते. तरी मी सुमारे पाच कोस तसाच चालत गेलो. तेथे मला एक डोंगर लागला. त्या डोंगराच्या कडेला मात्र बाण लागून एक खूण पडली होती व तो बाणही

तेथच खाली पडला होता. तो माझाच बाण होता. इतक्या लांब माझा बाण येणे शक्य नाही, यात काही तरी गूढ आहे असे मला वाटले; मी ते गूढ शोधून काढण्याचे ठरविले आणि मला ते गूढ उकललेही; पण माझी विनंती आहे की, ते गूढ मात्र आपण विचारू नये. ते गूढ उकलताना माझ्या सुदैवाने मला फार मोठा सुखाचा ठेवा मिळाला. आपण काळजीत असू नये म्हणून मी आपल्या केवळ भेटीसाठी आलो आहे. आणि लवकर जाणारही आहे. असाच मधून मधून आपल्या भेटीला यत जाईन."

बादशहा म्हणाला, "बाळ! तू आनंदात होतास हे ऐकून मला समाधान वाटले. तू कुठे होतास, हे सांगण्याची तुझी इच्छा नाही, तर नको सागूस. तुझे गुपित तुझ्याजवळच ठेव. पण मला असे वाटते की, तू खूप वेळ माझ्याजवळ राहावास. म्हणून तू वारंवार येत जा व मला भेटून जात जा, म्हणजे मला काहीसे बरे वाटेल!"

तीन दिवस वडिलांकडे काढून राजपुत्र महंमद बानूकडे गेला. तो परत आलेला पाहून तिला फार आनद झाला व आपण विना-कारण संशय घेतला होता असे वाटून तिने राजपुत्राची क्षमा मागितली.

पुन्हा सुखाचा संसार सुरू झाला. एक महिना उलटून गेला, पण राजपुत्राच्या वागणुकीत थोडा फरक पडलेला आढळला. अगोदर तो पित्याबद्दल खूपखूप बोलायचा ते बोलणे त्याने आता अजिबात बंद केले. आपल्या प्रवासाबद्दलही तो काही बोलला नाही. त्याचे मात्र बानूला फार फार आश्चर्य वाटू लागले, अन् एके दिवशी ती म्हणाली, "पतिराज, आपण आपल्या वडिलांबद्दल बरेचसे काही सांगत होतेत, आता काहीसुद्धा बोलत नाही. एकदा फक्त बोल-लेत की, मी मधूनमधून तुमच्या भेटीला येईन' असं आश्वासन

वडिलांना दिले आहे. मग एक महिना झाला तरी अजून कसे जात नाही भेटीला ?"

राजपुत्र म्हणाला, "गोष्ट खरी आहे तुझी, पण माझे जाणे म्हणजे तुला नाराज करणे, म्हणून आपला बसलो गप्प."

बानू--"तसे नव्हे. माझा आता तुमच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. मधूनमधून जाण्याला माझी कोणतीच हरकत नाही. मला न विचारताही गेला, तरी माझे काही म्हणणे नाही खुशाल जात जा."

दुसऱ्याच दिवशी राजपुत्र महंमद आपल्या वडिलांच्या भेटीसाठी रवाना झाला. आणि पुढे असाच मधूनमधून तो जाऊ लागला.

## चेटकीची लबाडी

राजपुत्र ज्या ज्या वेळी आपल्या वडिलांना भेटायला येत असे त्या त्या वेळी तो फारच वैभवात असे. त्याचा थाटमाट मोठ्या बादशहासारखा असे. त्याचे ते वैभव पाहून बादशहाच्या दरबारातील काही लोक त्याचा विनाकारण द्वेष करू लागले आणि त्यांनी बादशहाच्या कानात त्याच्याबद्दल भलभलत्या कागाळ्या सांगायला सुरुवात केली. ते म्हणाले, "महाराज ! राजपुत्र जरी आपल्या भेटीला येतो, आपल्याबद्दल आदर व प्रेम आहे असे दाखवितो, तरी त्याचा हेतू निराळाच आहे. आम्हाला तर असे वाटते की, ह्या वैभवाचे प्रदर्शन करावे, लोकांना वश करून घ्यावे आणि आपणाविरुद्ध बंड करावे असा राजपुत्राचा हेतू असून आपण ह्या गोष्टीची दखल घेतलीच पाहिजे."

पण बादशहाला हा विचार तितकासा रुचला नाही. तो म्हणाला, "हे शक्य नाही. माझ्या महंमदाची माझ्यावर पूर्ण निष्ठा आहे."

त्यावर ते लोक म्हणाले, "महाराज ! असं असतं तर आम्हाला खरोखरच फार आनंद झाला असता, पण तसं आम्हाला वाटत नाही. नूरनिहारच्या विवाहापासून राजपुत्र महंमद हा पार बदललेला दिसत आहे. आपणासाठी व प्रजेसाठी आम्ही आपणाला सावध करीत आहो. आपण आमचे विचार जरूर लक्षात घ्यावे अशी आमची विनंती आहे."

ह्या लोकांना त्या वेळी जरी बादशहाने विशेष काही न बोलता रवाना केले तरी त्यांच्या बोलण्याचा परिणाम मात्र बादशहावर चांगलाच झाला आणि राजपुत्राच्या ठिकाणाचा शोध केलाच पाहिजे असे त्याने ठरविले.

बादशहाने पुन्हा त्या चेटकीला बोलावणे पाठविले आणि एकांतात घेऊन तो तिला म्हणाला, " बाई ! तुम्ही माझा मुलगा जिवंत आहे म्हणून सांगितले होते, तो खरोखरच जिवंत आहे, मला तो भेटला आणि दरमहा एकदा भेटायला येतो, पण तो राहतो कोठे हे मात्र सांगत नाही तो कुठे राहतो, काय करतो हे जाणून घेण्याची माझी फार इच्छा आहे. एवढा पत्ता जर आपण लावून द्याल तर फार उपकार होतील. मी आपणाला खूप मोठे इनाम देईन."

ती चेटकी ह्या कामगिरीला तयार झाली. सध्या राजपुत्राचा मुक्काम तेथेच होता, व तो केव्हा जाईल ह्याचा काही नेम नव्हता. म्हणून चेटकी आधींच त्या पर्वतावर जाऊन लपून बसली.

दुसऱ्याच दिवशी राजपुत्र घोड्यावर स्वार होऊन पर्वताकडे येत असलेला तिने पाहिला. तेथून तो एका दरीकडे गेला आणि तेथे नाहीसा झाला. चेटकी त्या दरीत गेली. तिने बरीच शोधाशोध केली पण तिला काही सुगावा तेथे मिळाला नाही. तिला तो दरवाजा दिसायला पाहिजे होता, पण बानू परीने त्या दरवाज्याची

फारच निराळी व्यवस्था केली होती. तिने तो जादूने भारून टाकला होता व तो ज्याला दिसावा अशी वानूची इच्छा असे त्यालाच फक्त तो दिसत असे. इतरांना मुळीच दिसत नसे.

शेवटी चेटकी परत आली. घडलेली सर्व हकिकत बादशहाला कथन करून ती पुढे म्हणाली, "महाराज ! मी आपणाला असे आश्वासन देते की, मी राजपुत्राचा शोध जरूर लावून देईन, पण मला काही अवधी मात्र मिळाला पाहिजे."

तिचे ते बोलणे ऐकून बादशहाला थोडेसे बरे वाटले. त्याने तिला एक मूल्यवान हिरा भेट दिला व रवाना केले.

ती चेटकी थोड्याच दिवसांनी पुन्हा त्या दरीत गेली आणि जेथे राजपुत्र नाहीसा झाला होता तेथे जाऊन बसली.

दुसऱ्या दिवशी राजपुत्र आपल्या लवाजम्यासह त्या गुप्त दरवाज्यातून बाहेर पडताच तिला दिसला आणि लगेच तिने आजाऱ्याचे ढोंग केले. ती सारखी कण्हत राजपुत्राकडे दीन मुद्रेने पाहू लागली.

तिच्याकडे पहाताच राजपुत्राला तिची दया आली. अन् तो तिची विचारपूस करू लागला. ती म्हणाली, "बाबारे ! ह्या जवळच्या शहरात माझे घर आहे, मी परगावहून आले आणि घरी जात आहे, पण मला बरे वाटत नाही, मला चालवत नाही, आता काय करू मी ? कोण पोचवील मला ?"

राजपुत्राला तिची दया आली. तो म्हणाला, "म्हातारे ! काही घाबरू नकोस मी तुला मदत करतो. चल माझ्याबरोबर." लगेच राजपुत्राबरोबरच्या दोन शिपायांनी तिला घोड्यावर बसवून घेतले व राजपुत्र तिला घेऊन परत परीच्या महालाकडे निघाला. झाले! चेटकीचे कारस्थान यशस्वी झाले.

राजपुत्र ताबडतोब का परतला ? हे पहाण्यासाठी बानू परी धावतच त्याला सामोरी आली. चेटकन् राजपुत्र म्हणाला, "प्रिये, ही एक म्हातारी फार दुःखी आहे. हिला मदत करण्याचे मी वचन दिले आहे. तुला पण तिची दया येईल. तू पण हिला सहाय्य केले पाहिजे."

बानू परीने त्या चेटकीला अगदी निरखून बघितले आणि ती दासींना म्हणाली, "जा, हिला महालात घेऊन जा व अगदी उत्तम सोय ठेवा हिची." दासी चेटकीला घेऊन गेल्यावर बानू परी राजपुत्राला म्हणाली, "प्राणप्रिया ! आपण ह्या म्हातारीवर दया केली, पण ही म्हातारी आजारी मुळीच नाही. मला फार मोठी शंका येते. काही तरी धोका आहे. तुम्ही सरळ मनाचे म्हणून फसला. असो ! चिंता करू नका, कितीही संकटे आली तरी ती निवारण करण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी आहे. जा, तुम्ही आता वडिलांना भेटून या आनंदाने." नंतर राजपुत्र बापाच्या भेटीला निघून गेला.

तिकडे दासींनी त्या चेटकीला महालात नेले. तेथे तिची चांगली सेवा सुरू केली. तिला मऊ बिछान्यावर झोपविले व औषधपाण्याची सोय केली. औषध घेतल्यावर प्रहर दोन प्रहर तिने विश्रांती घेतली. राजपुत्राचे गुपीत आता तिला माहीत झाले होते. तिचे कार्य संपले होते. आता येथून बाहेर कसे पडावे व बादशहाला ही बातमी लवकर कशी कळवावी ह्याच गोष्टीकडे तिचे लक्ष लागले होते. ती दासींना म्हणाली, " बाई ! तुमच्या औषधाचा भारी गुण दिसतो; मला आता पूर्ण बरे वाटते, आता तुमच्या मालकीणबाईंना भेटवा मला. मला त्यांचे आभार मानले पाहिजेत."

मग दासींनी तिला बानू परीच्या राजवाड्यात नेऊन तिच्यापुढे उभे केले. चेटकीने बानू परीला नमस्कार केला अन् ती

म्हणाली, "बाईसाहेब! आपले माझ्यावर फार उपकार झाले आहेत. मी ते जन्मभर विसरणार नाही. मी आता पूर्ण बरी झाल्ये. चालण्याची शक्तीही आता आली आहे. मला आता घरी जाण्याची परवानगी द्याल तर मेहेरबानी होईल."

बानू परीने दासींना हुकूम दिला की, "दासींनो! ह्या बाईंना बिदा करा." चेटकी दरवाज्याजवळ आली आणि दासींचे आभार मानून ती तेथून घराकडे निघाली थोडे लांब गेल्यावर तिने दरवाज्याकडे वळून पाहिले, पण तो काही तिला दिसला नाही. तो गुप्त झाला होता.

# विलक्षण तंबू

चेटकी गेली सरळ बादशहाकडे. तिने पाहिलेली सर्व हकीकत बादशहाला कथन केली. नंतर ती म्हणाली, "महाराज! मला बानू परीचे वैभव पाहायला मिळाले, पण तिचे अंत:करणही मी ओळखले. कोणतीही स्त्री आपल्या पतीशिवाय कोणाचीही सेवा करणार नाही, इतकी सेवा ती राजपुत्राची करीत असते असे मला आढळले. पण महाराज! आणखी एक गोष्ट आपण लक्षात घ्यावी. आज राजपुत्र सरळ स्वभावाचे दिसतात, पण पुढे ते बदलणार नाहीत असे कशावरून? त्यांचे वैभव फार आहे, शक्तीही फार आहे, आणि ते एका स्त्रीच्या ताब्यात आहेत ह्या गोष्टीचा विचार करावा अन् सावधगिरी बाळगावी अशी आपणाला विनंती आहे."

प्रधानमंडळातील लोकांच्या व चेटकीच्या सांगण्यावरून आता मात्र बादशहाच्या मनात राजपुत्र महंमदाबद्दल फार भीती निर्माण झाली आणि तो अधिकच चिंताग्रस्त झाला. लगेच त्याने मंत्रीमंडळाची बैठक घेतली. चेटकीलाही तेथे बोलाविली आणि सर्व चर्चा केल्यानंतर ह्यावर उपाय काय करावा असा प्रश्न त्याने प्रधानांना विचारला.

त्यावर एक प्रधान म्हणाला, "महाराज ! राजपुत्र महंमदामुळे आपल्यावर असा प्रसंग येणार आहे, तर आपण राजपुत्राला कैद करावे व एखाद्या मजबूत किल्ल्यात जन्मभर कोंडून ठेवावे म्हणजे झाले. संकटाचे कारण राहणार नाही."



सर्व प्रधानांना हा उपाय पसंत पडला; पण चेटकी म्हणाली, "महाराज ! मध्येच बोलते क्षमा असावी. कारण मला वाटते की, राजपुत्राला पकडले तर त्याच्याबरोबरच्या लोकांनाही पकडावे लागेल, पण ते शक्य नाही. ती सर्व मंडळी जाऊन बानू परीला खबर देतील मग ती आपल्या पतीसाठी--राजपुत्र महंमदासाठी-आकाश पाताळ एक करील. म्हणून हा उपाय आपण योजणे म्हणजे संकटाला आमंत्रण देणे आहे."

बादशहा म्हणाला, " मग तुला काही सुचत असेल तर तूच सांग एखादी योजना. ती जर योग्य असली तर तोच उपाय करू !"

चेटकी-- " महाराज ! मला असे वाटते की, आपण राजपुत्राजवळ काही दिव्य आणि भव्य वस्तू मागाव्या. प्रथम आपण त्याच्याजवळ एक जादूचा तंबू मागा. तो उभारला म्हणजे आपले सर्व सैन्य त्याच्याखाली राहू शकेल इतका तो मोठा असावा. त्याचा आपणाला खूप फायदा होईल. त्याची पत्नी यक्षीण आहे. ती जादूने असा तंबू देईल. वारंवार अशा वस्तू आपण मागत राहा. आपणावर राजपुत्राची भक्ती असल्यामुळे तो बानू परीकडे हट्ट धरून अशा वस्तू मिळवून आणील. त्यात आपला अलोट फायदा होईल आणि समजा, बानू परीने त्या वस्तू पुरविल्या नाहीत, तर लाजेमुळे व संकोचामुळे राजपुत्र आपणापुढेच येणार नाही. बसेल बानूबरोबर सुख भोगत आणि तुमच्या पाठीमागची भीती आपोआप नाहीशी होईल."

बादशहाला चेटकीची सल्लामसलत पसंत पडली आणि तेच करावयाचे ठरवून त्याने प्रधानसभा संपविली.

दुसऱ्या दिवशी पितापुत्र एकत्र बसले असता बादशहा म्हणाला, "मुला ! मी तुझ्यावर फार प्रेम केले, पण तू विवाह केलास आणि तोही मला न विचारता ! मला प्रथम वाईट वाटले, पण तुझी पत्नी एक बलवान व संपत्तीवान् यक्षीण आहे आणि तुमचे एकमेकांवर फार प्रेम आहे हे मला कळले. त्यामुळे मला फार आनंद झाला. झाले ते झाले. आता सुखाने राहा हीच इच्छा! पण तू सुखात मग्न होऊन मला विसरू नकोस. उलट, मला तू तुझ्या बायकोकडून वेळोवेळी चांगले साह्य मिळवून द्यावे ही माझी

इच्छा आहे. आजच एक कामगिरी मी तुला सांगणार आहे. आपले सैन्य मोहिमेवर निघाले, म्हणजे बरोबर हजारों तंबू वाहून नेण्याचे काम भयंकर कठीण होते, म्हणून तू तुझ्या पत्नीकडून माझ्यासाठी एक तंबू मिळवून दे. तो एका माणसाच्या मुठीत राहिला पाहिजे व उभारला म्हणजे सर्व सन्य त्यात राहिले पाहिजे."

वडिलांची ही मागणी ऐकून राजकुमार स्तंभितच झाला. असा तंबू मिळणे कसे शक्य आहे ? असे त्याचे मन म्हणू लागले अन् आजपर्यंत त्याने स्वत: होऊन बानू परीजवळ काहीसुद्धा मागितले नव्हते. ते कसे मागावे असा त्याला प्रश्न पडला.

राजपुत्र म्हणाला, "बाबा, बानू परीचे माझ्यावर फार प्रेम आहे, पण मी मागितल्यावर अशी तंबूसारखी काही वस्तू ती मला देईल असे मला वाटत नाही. आता आपला मान राखावा म्हणून मी काढतो गोष्ट तिच्याजवळ. ती पूर्ण होण्याची आशा मात्र दिसत नाही. असो ! माझ्या नशिबी असेल त्याप्रमाणे होईल, पण हे नम्रपणे आपणाला सांगू इच्छितो की, जर असा तंबू मिळाला तर मला त्याबद्दल आनंद होईल पण जर नच मिळाला तर मात्र मी आयुष्यभर आपणाला तोंड दाखविणार नाही "

बादशहा ढोंगीपणाने म्हणाला, "बाळ ! अशी जन्माची ताटा-तूट आणि आपली ? काय बोलतोस हे ? शक्य नाही. मला तर ही कल्पनाही सहन होत नाही, पण मला माहीत आहे, तिचे तुजवर अत्यंत प्रेम आहे, ती मुळीच नाही म्हणणार नाही. जरूर तंबू मिळेल. तू संकोच करतोस. तू गोष्ट काढ की काम फत्ते ! समजलास ?"

राजपुत्र यक्षिणीकडे परत आला, पण खिन्न मुद्रेने राहू लागला. त्याची उदासीनता बानू परीला जाणवली. तिने त्याला त्या उदासीनतेचे कारण विचारले. तो टाळाटाळ करू लागला; पण बानू

परीपुढे त्याला अधिक आढेवेढे घेता आले नाहीत, त्याने तिला सर्व हकीकत कथन केली.

ती हकीकत ऐकून घेतल्यावर बानू परी म्हणाली, " हे त्या थेरडीचेच काम. ती मुळीच आजारी नव्हती. तिच्याशिवाय दुसऱ्या कुणाला आपल्या ह्या संसाराचा सुगावा नाही. म्हणूनच तिने येथून जाण्याची पण फार घाई केली. तिचेच हे काम. बरे पण असो ! असा तंबूच काय, यापेक्षाही मोठमोठी कामं मी तुमच्याकरिता सहज करीन ह्याबद्दल खात्री बाळगा. तुमच्या प्रेमासाठी मी काहीहीं करायला तयार आहे."

अन् मग तिनं हाक मारली, " नूरजहान !"

नूरजहान आली. ती जामदारखान्यावर मुख्य होती. तिला बानू म्हणाली, " नूरजहान, आपल्या जामदारखान्यातील तो एक मोठा तंबू आण पाहू." थोड्याच वेळात ती तंबू घेऊन आली. तो हाताच्या मुठीत मावेल एवढा होता,तरी पण तो फार विशाल होता.

तो तंबू महंमदाच्या हाती देत ती म्हणाली, " हा घ्या तंबू आणि द्या आपल्या वडिलांना."

तो तंबू घेऊन दुसऱ्याच दिवशी राजपुत्र महंमद घोड्यावर स्वार होऊन आपल्या लवाजम्यासह वडिलांकडे निघाला व त्याने तो तंबू वडिलांना नजर केला.

बादशहाने तंबू घेतला आणि आपल्या प्रधानांसह व सेनापती-सह तो मैदानात गेला आणि त्याने तेथे तो तंबू उभारला. तो फार मोठा होता. सहज उभारता येत होता. त्याच्या सैन्याच्या दुप्पट सैन्य त्यात मावू शकत होते. आणि तो लहान-मोठाही करता येऊ शकत होता. हे पाहून बादशहाला फार अचंबा वाटला. बाकीच्या लोकांनीही तोंडांत बोटे घातली.

बादशहाने त्या वेळी तंबूबद्दल राजपुत्राचे व बानू परीचे आभार मानले. पण मनातून मात्र तो जास्तच चरकला. राजपुत्राने मनात आणले तर तो आपले राज्य बळकावून घेईल असे त्याला वाटू लागले. लगेच बादशहाने त्या चेटकीस बोलावून आणले आणि तिला पुढील सल्ला विचारला. तिने सांगितले, "महाराज ! ह्या वेळी आपण राजपुत्राला 'सिंहाच्या झऱ्याचे पाणी' आणण्यास सांगावे !"

दुसऱ्या दिवशी प्रधान मंडळी बसली असताना बादशहा राजपुत्राला म्हणाला, "बेटा ! तू माझी एक मोठी कामगिरी केलीस, आता दुसरी पण करशील अशी मला खात्री आहे. तुझ्या पत्नीकडे सिंहाच्या झऱ्याचे पाणी आहे. ते पाणी सर्व आजारावर रामबाण औषध आहे म्हणतात. मी आता म्हातारा झालो आहे. केव्हा आजारी पडेन याचा नेम नाही. तर ते जवळ असावं. तू एक शिशी भरून ते मला आणून दे म्हणजे मी माझ्या आरोग्याबद्दल निर्धास्त राहीन."

बापाचा हा प्रश्न ऐकून राजपुत्र महंमद काळजीत पडला. तंबू मिळाल्यावर बाप शांत होईल व आणखी काही मागणार नाही अशी त्याची कल्पना होती, पण ती चुकली. तो म्हणाला, "पिताजी ! आपणासाठी मी सगळे काही करायला तयार आहे. एवढे मात्र मी आपणाला सांगून ठेवतो की प्रयत्न मी जरूर करीन, यश देणे देवाहाती."


लगेच दुसऱ्या दिवशी राजपुत्र परत गेला व त्याने सिंहाच्या झऱ्याच्या पाण्याची गोष्ट बानू परीकडे काढली. आणि तो म्हणाला, "हे पाणी देणे किंवा न देणे तुझ्या मर्जीवर आहे. त्याबद्दल माझा तुला मुळीच आग्रह नाही."

त्यावर बानू म्हणाली, "छे ! त्यात काय इतके ! ती चेटकी आपली किती परीक्षा घेते ते तरी पाहू आपण. का घाबरता ?"

"तो सिंहाचा झरा एका मोठ्या किल्ल्यावर मध्यभागी आहे. आता तुम्ही दोन घोडे तयार करा. एकावर तुम्ही स्वार व्हा आणि दुसऱ्यावर एक बोकड कापून त्याचे चार भाग करून घ्या. त्या किल्ल्याच्या दरवाज्याशी गेल्यावर तुम्ही त्याला स्पर्श करा. लगेच तो दरवाजा उघडेल. तुम्हाला आत जाताच पहारा करीत असलेले चार सिंह दिसतील. तुम्हाला पाहताच ते गर्जना करतील, पण तुम्ही भिऊ नका. बकऱ्याचा एकएक तुकडा त्यांच्या अंगावर फेका. ते मांस खाण्यात गुंग होतील. तोच तुम्ही घोडा घेऊन आत शिरा व खाली न उतरता त्या झऱ्याचे पाणी एका शिशीत भरून घ्या आणि लगेच परत फिरा, म्हणजे तुम्ही सुखरूप परत याल. सिंह तुम्हांला मुळीच अपाय करणार नाहीत."

दुसऱ्या दिवशी सकाळी बानू परीने सांगितल्याप्रमाणे तयारी करून राजपुत्र सिंहाच्या झऱ्याच्या पाण्यासाठी रवाना झाला आणि बरोबर तिने सांगितल्याप्रमाणे त्याने केले. सिंहाच्या झऱ्याचे पाणी घेतले आणि तो परत फिरला. किल्ल्याचा लोखंडी दरवाजा ओलांडल्यावर त्याने मागे वळून पाहिले तर त्या चार सिंहांपैकी दोन सिंह त्याच्या मागून येत आहेत असे त्याला आढळले. तो प्रथम थोडा चरकला. मग त्याने जरा बारकाईने त्या सिंहांकडे पाहिले, पण ते सिंह काही हल्ला वगैरे करतील असे त्याला मुळीच वाटले नाही. ते केवळ त्याच्या मागून मागून चालत होते. तेथून तो सरळ बादशहाच्या राजधानीकडे निघाला आणि सिंह त्याच्या मागे निघाले. राजधानीची वेस आली. राजपुत्राचा घोडा आत गेला व तेथून सिंह मात्र परत फिरले, पण हे दृश्य ज्याने ज्याने पाहिले त्यांच्या तोंडचे पाणी पळाले व ते सर्व आपला जीव घेऊन पळत सुटले.

राजपुत्र तडक बादशहाकडे गेला आणि म्हणाला, " महाराज, हे सिंह झऱ्याचे पाणी. मी आपली सेवा बजावू शकलो याबद्दल मला अत्यानंद होत आहे."



बादशहाने राजपुत्राला आपल्याजवळ बसवून घेतले. तो म्हणाला, " बाळा, मला माहीत होते की, ही कामगिरी फार कठीण आहे; पण ती तू कशी निभावलीस ? मला सांगशील तर बरे वाटेल मला. माझा पुत्र एवढा पराक्रमी आहे, हे पाहून मला आता अभिमान वाटत आहे. तू खरोखरच माझा मुलगा शोभतोस."

राजपुत्र म्हणाला, " पिताजी ! सगळे श्रेय माझ्या पत्नीला दिले पाहिजे. तिने मार्गदर्शन केले म्हणूनच हे सर्व होऊ शकले." नंतर सिंह झऱ्याचे पाणी आपण कसे प्राप्त केले हे त्याने बादशहाला सविस्तर सांगितले.

BVBK-0400365


ते ऐकून बादशहाने वरपांगी आनंद प्रकट केला. बानू परीची वाहवा केली. परंतु मनातून मात्र तो बराच घाबरला. बानू परी भयंकर यक्षीण आहे, आता आपली धडगत नाही, केव्हा संकट येईल हे काही सांगवत नाही, असे त्याला वाटू लागले आणि लगेच ती बैठक मोडून तो खलबतखान्यात गेला. त्याने चेटकीला बोलावून घेतले आणि राजपुत्राकडे पुन्हा काय मागावयाचे हे ठरविले.

## शेबर

दुसऱ्या दिवशी सर्व सरदार मंडळींसमोर बादशहा राजपुत्रास म्हणाला, “ बाळा ! आता माझे एक शेवटचे मागणे तुझ्यापाशी आहे तेवढे पुरव म्हणजे झाले. मला एक हात उंचीचा, त्याची पंचवीस हात लांब दाढी आणि त्याच्या खांद्यावर पाच मणांची लोखंडी गदा असा एक माणूस आणून दे. ”

ही मागणी ऐकताच राजपुत्र आश्चर्यचकित झाला आणि तो चटकन म्हणाला, “ पिताजी, क्षमा करा. ही अशी विचित्र मागणी मला पुरी करता यायची नाही. ”

त्यावर बादशहा म्हणाला, “ ते काही नाही. ही गोष्ट झालीच पाहिजे. जर ही मागणी पूर्ण करावयाची नसेल तर तसे स्पष्ट सांग.”

बादशहाचा हा दुराग्रह पाहून राजपुत्र चूप बसला ! दुसऱ्या दिवशी तो बानू परीकडे गेला आणि तिला ही हकीकत सांगून म्हणाला, “हे प्रिये ! ह्या सर्व कारस्थानांच्या मागे माझा नाश करण्याचा हेतू आहे, असे आता मला वाटू लागले आहे. असा मनुष्य प्रथमतः सापडणार नाही. सापडला तरी तो अचाट शक्तीचा असेल आणि त्याला बादशहाकडे उभा करण्यासाठी मला त्याच्याशी सामना द्यावा लागेल आणि बहुधा त्या गदेच्या तडाख्याने मला